


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# गडचिरोली जिल्ह्यातील गोंडी समाज जीवनाचा अभ्यास

**श्वेता पवन चांदेकर**
संशोधक विद्यार्थीनी,
इतिहास अधिवीभाग,
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

**प्रस्तावना**

भारतातील मूळ रहिवासी म्हणून 'आदिवासी' समाज ओळखल्या जातो. आदिवासी समाजाचा इतिहास अति प्राचीन कालखंडाशी जोडला गेलेला आहे, भारतात आर्यनच्या आगमन होण्यापूर्वीच आदिवासी हेच या देशाचे मूळ रहिवासी होते आदिवासी लोक डोळ्यात डोळ्यांनी एकत्र राहायचे मात्र आर्यनचे आगमन झाल्यानंतर त्यांना त्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठी जंगलाचा आश्रय घ्यावा लागला दर्या खोऱ्यात राहून त्यांनी आपले अस्तित्व टिकवून ठेवले आदिवासी समाजाला विविध जमाती आणि त्या जमातीच्या वेगवेगळ्या पद्धती चालीरीती देव देवता उत्सव सण समारंभ यात झालेला बदल विशेषता हा गडचिरोली जिल्ह्यातील गुण जमातेच्या चालीरीती त्या जमातीच्या थोडक्यात इतिहास या प्रस्तुत प्रबंधात सादर करण्यात आहे महाराष्ट्र सुमारे 47 आदिवासी जमाती अस्तित्वात आहेत आणि त्या प्रत्येक जमातीचे समाजजीवन आर्थिक सांस्कृतिक वैशिष्ट्ये यांच्यासारखेपणा मात्र आढळत नाही भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतातील आदिवासी हा अनेकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आदिवासींच्या सामाजिक धार्मिक आर्थिक राजकीय जीवनाशी निगडित विभिन्न बाबी आणि प्रकार बघायला मिळतात अलीकडच्या काळात आदिवासी साहित्य भाषा संस्कृतीवर अनेक शोध संशोधने झालेले दिसून येतात आदिवासी कोण त्यांना आदिवासी का म्हणतात खरंच आदिवासी कोणाला म्हणायचे आणि मग त्यांच्या जमाती कोणत्या त्या कोणाच म्हणावे गोंडजमाती म्हणजे काय किंवा गुण कोणास म्हणावे त्याच्या आचार विचार विकास कसा झाला नक्षलवाद्यांशी त्यांचा संबंध कसा आला कुपोषण जमातीची उत्पत्ती स्त्रोत्र कुळे त्यांच्या पारंपारिक पद्धती आणि रीतीरीवाज साहित्य गोंडकला गुणभाषा बोलण्याच्या पद्धती गोंडी राजवंश आणि त्या राजवंशाच्या ऐतिहासिक माहितीवरून गोंडी लोकांचा अभ्यास करता येतो गोंडी ही आदिवासी गोंड जमातीची स्थानिक भाषा अथवा आदिवासींच्या एका जमातीचे भाषा आहे परंतु प्रमाण भाषा आणि इतर भाषेचा पडलेला प्रभाव यामुळे मात्र ही भाषा लुप्त होताना दिसते आदिवासींचा इतिहास हा लिखित स्वरूपात फारसा आढळत नाही लोकगीते स्थानिक लोक यांचा आधार घेऊनच इतिहासाचे मांडणी करावी लागते

आर्यनच्या आगमनानंतर त्यांनी आदिवासींवर आक्रमण केले, आणि आदिवासी लोक हे त्यांचे गुलाम म्हणून जगण्यापेक्षा भारताच्या घनदाट जंगलामध्ये राहू लागले. नदी नाल्यांचे पाणी पिऊन, कंदमुळे खाऊन ते जगू लागले, अशा पद्धतीने गोंडवाना एक समुदाय तयार झाला. एकच संघ तयार झाला मात्र गोंडवानाचे काही काळानंतर तुकडे झाले आणि हे विविध लोकांचे याला विविध लोकांची झालेली आक्रमणे कारणीभूत आहेत. आफ्रिका, भारत, ऑस्ट्रेलिया असे अनेक प्रदेश तयार झाले. भारताचा विचार करता विदर्भ मध्य प्रदेश आणि छत्तीसगड मध्ये अरण्यवासींमध्ये गोड जातीचे जनसंख्या अथवा लोकसंख्या अधिक आहे. स्वतंत्र भारतात गोंडवानाचे तीन भागात विभाजन केले एक विदर्भ दुसरा मध्य प्रदेश आणि तिसरा छत्तीसगड असे तिन्ही भाग पडतात मात्र असे जर विभाजन केले नसते तर भारताचा एक मोठा भाग किंवा एखादा मोठा राज्य म्हणून गोंडवाना दिसला असता गोंडी वंश संकल्पनेचा विचार करता गोंडी संस्कृतीचे जनक परिक्रुपात लिंगू यांनी गोंडी संस्कृतीचे संरचना तयार करताना एका गटसमूहात विभागणी केली जसे की चार पाच सहा सात अशा गटानुसार वाटणी केले. सुमारे 1000 वर्षांपूर्वी गोंडी संस्कृतीचे जनक परिकुमार लिंगू यांनी भंडारा जिल्ह्यातील कचारगड येथे सात वर्ष तपश्चर्य केले आणि त्यांच्या अखंड साधनेतूनच त्यांना गोंडी संस्कृतीचे संरचना केली. गोड लोक हे असे म्हणतात की काली कंकालीच्या 33 मुलांना कचार लोहा गड पर्वतातील गुफेतून मुक्त करून गोंडी संस्कृतीचे तत्वज्ञान दिले आणि त्यामुळेच गोंधळ लोक परिकुमार लिंगा यांना आपला मोठा देव म्हणतात गोंडाच्या राजगोन दुर्वे किंवा नाईक गोंड खेताले खातुलवार गुण माडिया गुंड या पोट जाती आहे अभिजात संस्कृतीचे जोपासना करण्यासाठी गोंडांना पोळी सुद्धा म्हणतात गोंडी जमात अजूनही आपल्या प्रथा परंपरा रीती रिवाज संस्कृतीचे जपणूक करतात

## अंगवस्त्रे आणि दाग दागिने

आदिवासी जमातींमध्ये अंग वस्त्र परिधान करण्याच्या पद्धती इतर समाज बांधवांपेक्षा वेगळे आहेत गोंडी स्त्रिया ह्या गुडघ्यापर्यंत लुगडं ह्या नऊवारीप्रमाणे साडी नेसतात त्यांच्या उरलेल्या पदरापासून पक्षाचा भाग जागतात विशेष म्हणजे गोंडी स्त्रिया चोळी बरेदान करत नाही मात्र बदलत्या काळानुसार आता मुली आणि स्त्रिया चोळी वापरताना दिसून येते. गोंडी अथवा आदिवासी लोकांमध्ये गोंदवण काढून घेऊन अंग झाकण्याचे जे प्रत आहे त्याचाही उपयोग करतात गोंडी स्त्रिया गोणवन हे कपाट होऊन वाटी घाल पाठ छाती हा तिचा दंड इत्यादी ठिकाणी काढून अंग झाकण्याचा प्रयत्न करतात या गोद्वानात फळे फुले सूर्य चंद्र देव देवता विविध नक्षीकाम एखादे गाणे काही ठिकाणी उभ्या आणि आडव्या रेषा ह्या देखील दिसून येतात गोंडी स्त्रिया केसांच्या डोक्याच्या मागे केसाचा जुळा बांधतात म्हणजे संपूर्ण केस डोक्याच्या वर गुंडाळतात त्यात कंगवा खवतात त्यात

मोरपीस किंवा विविध पक्षांचे छोटे छोटे परदेखील लावतात पुरुषांच्या बाबतीत विचार करायचा झाला तर पुरुष कमरे भोवती तोतराचा लहानसा तुकडा गुंडाळतात परंतु शहरीकरण आणि आदिवासींचा शहरांशी आलेला संबंध यामुळे यांच्यात बरेचसे परिवर्तन झालेले दिसते मात्र गडचिरोली जिल्ह्यातील जिल्ह्यामधील दुर्गम भागात आजही आदिवासी लोकं पारंपारिक पोशाख परिधान करताना आपल्याला दिसतात आदिवासी लोकांमध्ये गोठून नामक संस्था किंवा समाज जीवनाचा एक भाग दिसून येतो यात गोंडी लोकांमध्ये गुंटूर बाबत वेगवेगळ्या दंतकात आहे आणि गोठून हे आदिवासी व्यतिरिक्त इतर जाती धर्मात दिसूनही येत नाही आदिवासींच्या फोटोवर अनेक विद्वानांनी आपापली मते मतान तरी केलेली आहे तरुण पिढीला किंवा तरुण लोकांना समाज जीवनाबद्दलचे ज्ञान देण्यासाठी गोठुल ही एक रचना आदिवासी समाज जीवनात दिसून येते

एसी हेडन यांच्यामध्ये सामाजिक सांस्कृतिक राजनैतिक धार्मिक संसारीक आणि आर्थिक संबंधाचे ज्ञान देण्यासाठी ही एक घोटून एक शाखा अथवा संस्थान आदिवासींमध्ये गोंड विशेषतः गडचिरोली जिल्ह्यातील माडिया गुंड या जमातीत कुर्मा घर नावाचे एक पद्धत ओढ आहे ज्या स्त्रीला मासिक पाळी आल्यानंतर तीन ते चार दिवस ह्या कुर्मा घरात राहावं लागतं किंवा ते राहतात कुर्माघर म्हणजे अशी झोपडीचे गावाच्या बाहेर निर्माण केलेली असते ज्यात आदिवासी स्त्री तिच्या मासिक पाळीच्या वेळेस किंवा मासिक धर्माच्या वेळेस तिथे राहतात यावेळेस तिच्या जीवनाखाण्याची व्यवस्था तिचा तिचा परिवार करत असतो किंवा तिथे असणाऱ्या उपलब्ध साहित्यातून ती स्वतःचा अन्नधान्याची व्यवस्था सुद्धा करत असते सुरुवातीच्या कालखंड कार्याचा जर विचार केला तर कुर्मा घराची पद्धत हे एखाद्या मोठ्या वटवृक्षाच्या झाडाखाली किंवा एखाद्या मोठ्या झाडाखाली करायचे परंतु सध्याच्या स्थितीत अशा झोपडी ची व्यवस्था करण्यात आलेली आहे

**पारंपारिक व्यवसाय**

गडचिरोली जिल्ह्यातील माडिया गुंड आणि गोंड जमातीतील लोकांचा पारंपारिक व्यवसाय म्हणजे भात शेती करणे हाच व्यवसाय होता हल्ली शिकार बंद असल्यामुळे जंगलातील शुल्लक खूपच वेचणे मासे पकडणे कोंबडी पालन बकरी पालन हस्तव्यवसाय हाच मुख्य व्यवसाय आहे . एका विशिष्ट अशा कले चे शिक्षण घेतलेले नसणे तरी सुद्धा हे निसर्गात आहात त्यांच्यात अंगातच कलात्मक वस्तू बनविणे वाद्य बनविणे आणि ती वाजवणे ही कला अवगत असते त्यात लाकडावर कोरलेले हत्ती घोडे पशुपक्षी त्याचबरोबर वेगवेगळ्या संस्कृतीक प्रतीके देवदेवता वाद्य सजावटीच्या वस्तू बांबू पासून तयार केलेल्या वस्तू त्या टोपल्या पंखे सुपर कंगवे इत्यादींचा समावेश होतो तेंदु पत्ता गोळा करून सुद्धा त्यांची बंडले बांधणे आणि ते इतर ठिकाणी विकणे

हा सुद्धा आदिवासी लोकांचा मुख्य व्यवसाय अथवा गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी लोकांचा मुख्य व्यवसाय मांडण्यात हरकत नाही अलीकडे चंद्रपूर आणि गडचिरोली भागात बांबू व्यवसाय मोठ्या प्रमाणात होत्या त्यात बांबू पासून तयार केलेल्या वेगवेगळ्या वस्तू बघायला मिळतात हे जवळच्या आठवणी बाजारात नेऊन विकतात बांबूपासून बासरी सारखे एक वाद्य तयार करतात ज्याला ते पिपा असे म्हणतात एकाच वेळेस दोन पिवा वाजवू शकतात किंवा एकाच वेळेस दोन व्यक्तीवांमधून आवाजही येऊ शकतो मोह फुले लाख डिंक गोंद मधुपत्ता आणि जंगली वनस्पती याचबरोबर तंबाखूच्या पाण्याच्या विड्या तयार करून त्या इतर बाजारपेठेत विकण्याचा देखील गोंडी लोकांचा व्यवसाय आहे आदिवासी लोक मासे पकडण्यासाठी जाळे म्हणतात मासे त्यांच्या आवडीचे खाद्य असल्यामुळे नदी नाले या ठिकाणी जाळे टाकून ते मासे पकडतात

**सण आणि उत्सव, नृत्य**

गोंड समाज सण आणि उत्सव प्रिय आहे आदिवासी समाज देखील तसाच आहे मानिया गुण सणांना पंडू म्हणतात या चार महत्त्वाचे प्रकार आहेत पहिला पाऊस पडल्यावर त्यात पत्ती पंडू आणि दुसरा बियांची पेरणी करताना भिन्न बंडू असे म्हणतात यालाच इरप्पा बंडू मसी म्हणतात तर नवीन धान्य दळताना किंवा तांदळाची पिठी तयार करताना पिंडी पंडू असेही म्हणतात नवीन धान्य तयार करताना किंवा नवीन धान्य काढताना आणि पशुधनाची पूजा करताना कुरूप पडून असे किंवा पोलवा हा सण उत्सव त्यांनी साजरे करतात किंवा त्याला पुलवा म्हणतात प्रत्येक सणाला ग्रामदेवतेची पूजा करतात बळी देतात मेजवानी करतात तोला तोलामृत्ये नृत्य विभाज्य असतात ग्रामदेवता आहे त्यांचा हिंदू लोकांच्या पूर्वीपासून आदिवासी लोकांवर प्रभाव असल्यामुळे दिवाळी दसरा होळी यासारखे महत्त्वाचे सण देखील गोंडी लोक साजरे करतात

नृत्य आणि संगीत हा गोंडी जीवन आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. यात संपूर्ण समूहभाग घेतो रोज सायंकाळी घोटून जवळ एकत्रित येऊन नाचतात गाणी म्हणतात आणि सर्वच जीवन चक्र विधींच्या वेळी मुख्यत्वे विवाह समारंभ धर्म विधीच्या वेळेस संगीताच्या तालावर सामूहिक रित्या ते नृत्य करतात गोंड कला ही एक लोककला आहे यात सैला, ढेमसा, रीना, रेला,( रीला) यासारखे, नृत्य विवाह प्रसंग, शेतीतील नवीन पीक लावताना, जन्मोत्सव ह्यासारख्या प्रसंगात करतात. एक प्रकारे गोल्फेर धरून थोड्या थोड्या वेगवान अंतराने नाचतात गोंडी नृत्य हे थोडेसे वेगवान आणि थोडेसे धडाकेबाज अशी नृत्यकाला आहे ढोल पायात घुंगरू चिटकोरा यासारखी वाद्य वाजवून गोड लोक एक समूह नृत्य करतात. रीला हे नृत्य फारच प्रसिद्ध आहे परस्परांच्या खांद्यावर हात ठेवून नर्तकांचे रांग दोन पावले पुढे व एक पावले मागे अशा पद्धतीने संगीताच्या तालावर नाचते ही एक भिन्न नृत्यशैलीचा प्रकार आहे यात हालचालींचा वेग हा संपूर्ण

वेगवान असून पूर्ण समूह पुढे मागे सरकत जातो दसऱ्याच्या वेळे विशेषतः हे नृत्य केले जातात. या नृत्य साठी गडचिरोली जिल्ह्यातील गोंड समाजातील लोकांची स्वतःची अशी गाणी आहेत प्रत्येक प्रसंगानुसार या गीताला किंवा ह्या गाण्याला ते पाटा असे म्हणतात मगनिंग पाटा म्हणजे लग्नाच्या वेळेस म्हणायचे गीत भावनाप्रधान गंमत टिंगल करणारी असेल एक जण एक ओळ म्हणतो व इतरही ओढतात म्हणजेच तेच तेच गाणे पुनरुच्चार करतात सर्वसाधारण भाषेत याला कोरस किंवा समूह गायन असे सुद्धा म्हणतात. सणसमारंभ प्रसंगा नुसार काही गाणी गायली जातात यात पारंपारिक गाणी देखील गायले जातात. गोंडी लोक नृत्य आणि संगीत म्हणताना त्यांच्या वाद्यांमध्ये प्रामुख्याने ढोल बागही नगारा चिटकुरा यांचा समावेश होतो या सर्वच वाद्य स्थानिक स्तरावर तयार करतात कुकूंनी वादक हा त्या नृत्याची लय आणि ताल ठरवतो म्हणजेच एका अर्थी संगीत आणि नृत्यांचे तो दिग्दर्शन करत असतो.

एकूणच आदिवासी जमातीमध्ये सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या जमातीपैकी एक महत्त्वाची आदिवासी गुण जमात आहे या जमातीची संस्कृती वेगळी आहे या संस्कृतीचे देवदेवता त्यांच्या विधी त्यांच्या नृत्य विषयीचे आवड त्यांच्या संस्कृती मधले विविधता मात्र इतर प्रचलित समाज व्यवस्थेचा पडलेला प्रभाव यामुळे गुणांची संस्कृती संकरित झालेल्या त्यामुळे मूळ संस्कृतीचे जतन करणे गरजेचे आहे आज आदिवासी मुले शिकू लागले परंतु त्यांना आपण आदिवासी आहोत असे म्हणून घेणे सुद्धा कमीपणाचे वाटायला लागले आधुनिकीकरण आणि बाह्य समाजाचे आलेल्या त्यांचा संबंध यामुळे मूळची संस्कृती विसरून बाह्य संस्कृतीचा पोशाख परिधान करतात आणि बाह्य संस्कृतीचे आदिवासी लोक आचरण करू लागलेत

गोंडी लोकांची देव देवता म्हणजे पेरसापेन हा आहे. गडचिरोली चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी गोंड माडिया गोंड परधान कोलाम या सर्व जमातीमध्ये फेरसापेन यांनाच सर्वश्रेष्ठ देवता मानतात किंवा बडा देऊन हाच आहे तसेच महाकाली हे दैवत असून गोंड राणी हिराई हिने चंद्रपूर येथे महाकालीचे भव्य मंदिर मांडले. गोंडाचा मसीहालिंगो व त्याची बहीण जनालिंकू जंगो देवी याची सुद्धा पूजा करतात शिवाय अनेक स्थानिक देवता ही त्यांची पूजा करतात गुणांचं असे मान्य आहे की देव देवता झाडावर किंवा त्याच्या मुळाशी स्थापित झालेले असतात सलाईचा वृक्ष हा त्यांची पौराणिक वृक्ष असून त्यावर बळादेवाचा निवास असतो अशी गोंडी लोकांची किंवा माडिया गोंडी लोकांची श्रद्धा आहे गावाच्या वेशीवर लहान झोपडीत देवदेवतांची स्थापना केलेली दिसते त्यात दगडाची किंवा लाकडाचे लहान लहान देवही दिसतात याचा जागोपाशी किंवा धर्मवीर विविध सामूहिक स्तरावर साजरे करतात त्यानंतर नृत्य आणि नंतर मेजवानी यासारखे ही कार्यक्रम घेण्यात येतात धर्माविधीत कोंबडा किंवा बकऱ्याचे बळी पण देतात

## आदिवासी गोंडी शैक्षणिक आणि भाषिक समस्या

"देशाला स्वतंत्र मिळवून आज जवळजवळ 75 वर्षे झाली असली तरी सुद्धा देशाचे मूळनिवासी किंवा रहिवासी असलेला आदिवासी समाज मात्र अजूनही मागासलेल्या अवस्थेत जीवन जगत आहे आदिवासी समाजात कुपोषण अंधश्रद्धा दारू गांजाचे व्यसन लैंगिक समस्या बालविवाह इतर समाजाचे अतिक्रमण धर्मांतरण इत्यादी समस्या जाणवतात या समस्यांचे मूळ कारण म्हणजे शिक्षणाचा अभाव शिक्षणाच्या अभावामुळेच आदिवासी समाज सुधारण्याच्या प्रवाहापासून लांब राहिला किंवा प्रचलित समाज व्यवस्थेपासून तो थोडा लांब राहिला" कोणत्याही समाजाचे सुधारणा व करायचे असेल किंवा झाली पाहिजे करायचे असेल तर त्या समाजात शिक्षणाचा प्रसार होणे आवश्यक आहे भारतीय संविधानाच्या 342 व्या कलमात अनुसूचित जमातींचा सामाजिक आर्थिक आणि आर्थिक विकासाची तरतूद केली जाते. गोंडी भाषेला स्वतःची अशी लिपी नाही अथवा आदिवासी भाषेला लिपी नाही ती बोलीभाषा आहे आणि याचा परिणाम आदिवासी अथवा गोंडी मुलांवर होताना दिसतो शिक्षणाचा विचार केला असता गोंडी लोक अथवा आदिवासी लोक हे घरी स्वतःच्या बोली भाषेत बोलतात मात्र प्रचलित समाज व्यवस्था आणि शिक्षण व्यवस्थेत प्रमाण भाषेला असणारा महत्त्व आणि गोंडी भाषा ही अति प्राचीन द्रविडीयन कुळातील भाषा असून तिला प्रचलित भाषेला जेवढं स्थान मिळालं तेवढं गोंडी भाषेला मिळालेलं नसल्याकारणाने समाजात मान्यता मिळालेली नाही आणि समाजात बोलत असताना मिळालेली दुय्यम वागणूक त्यामुळे बोंडी भाषा आज लुप्त होण्याच्या मार्गावर आहे अतिदुर्गम भागात बोलण्याचा गोंडी भाषा ही शिक्षण व्यवस्थित वापरल्या जात नसल्यामुळे आणि प्रस्थापित समाजव्यवस्था शिक्षणातील वाढता प्रभाव यामुळे प्रचलित भाषा या समजण्यास अडचण येते. गडचिरोलीच्या काही भागातील परिस्थिती अशी आहे की तिची शाळा आहे पण शिक्षक नाही आणि शिक्षण आहे पण विद्यार्थी नाही किंवा विद्यार्थी आहे पण शिक्षक नाही हे आजची स्थिती गडचिरोलीच्या काही आदिवासी भागातली आहे आजही गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी लोकांपर्यंत शैक्षणिक सुविधा अथवा शिक्षणाच्या शैक्षणिक विविध योजना सुविधा वेळेवर पोहोचत नसल्यामुळे तो समास दुर्गम राहिला किंवा त्या समाजाचा पाहिजेत असा विकास झालेला नाही.

**संदर्भ ग्रंथ:**

1)गोंडी संस्कृतीची वास्तविकता नंदकिशोर नेताम गोंडवाना गोटुल साहित्य निर्मिती व प्रकाशन संस्था मेंढालेखा जिल्हा गडचिरोली

2)गोंडवानाचा सांस्कृतिक इतिहास शेषराव अंड मडावी सुधीर प्रकाशन वर्धा

3)आदिवासींचे जीवन आणि संस्कृती चित्रमय दर्शन डॉक्टर देवगावकर डॉक्टर शैलजा देवगावकर श्री साईनाथ प्रकाशन नागपूर

4)महाराष्ट्रातील आदिवासी शौनक कुलकर्णी डायमंड पब्लिकेशन

5)गोंडी संस्कृतीचे संदर्भ व्यंकटेश आत्राम सुधीर प्रकाशन वर्धा

5)आदिवासी समाजाचे समाजशास्त्र डॉक्टर प्रदीप आगलावे साईनाथ प्रकाशन नागपूर

6)महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य डॉक्टर शैलजा देवगावकर साईनाथ प्रकाशन नागपूर